IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# महात्मा ज्योतिबा फुले : स्त्री शिक्षण कार्य

**सौ. योजना यो. हळदे**

एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**सारांश:**

**महात्मा फुले यांनी पुण्यात मुलींच्या शिक्षणासाठी १८४८ मध्ये शाळा सुरू केली. मुलींच्या शिक्षणासाठी प्रथम सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देत समाज सुधारण्याची सुरुवात स्वतःपासून केली तर समाजघडवता येतो हे महात्मा फुले यांनी दाखवून दिलं.सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देत महात्मा फुले यांनी शाळा चालवल्या.**

**प्रस्तावना:**

**महाराष्ट्राला देशभरात पुरोगामी राज्य म्हणून पुरोगामीत्वाचा पाया क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी रचला. महात्मा फुले यांनी तत्कालीन समाजातील कर्मठ पुराणमतवाद्यांचा विरोध पत्कारत मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या आणि भारतातील स्त्री शिक्षणाचा पाया रचला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यात मुलींच्या शिक्षणासाठी१८४८ मध्ये शाळा सुरू केली मुलींच्या शिक्षणासाठी प्रथम सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देत महात्मा फुले यांनी शाळा चालवल्या महात्मा फुले यांचं सावित्रीबाई फुले यांच्या सक्रिय सहभागाच्या जोरावर स्त्री शिक्षणाचा आणि सामाजिक काम सुरू होत शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्या दुःखमुक्तीचा आणि शोषणमुक्तीचा ध्यास ज्योतिबा फुले यांनी घेतला होता.**

**महात्मा फुले यांचे स्त्रीयांच्या शिक्षणासाठी कार्य :**

**त्याकाळी समाजात स्त्रियांची दशा तर आणखीनच विचित्र होती समाजात त्यांना मानाचे स्थान नव्हतं घराचा सर्व संसार सांभाळण्याची स्त्रीची अवस्था गुलामासारखी होती त्यांना शिकण्याचा अधिकार नव्हता तसेच एखाद्या गोष्टीत आपलं स्वतःचं मत सांगण्याची मोकळीक नव्हती . दृष्ट रूढी अनेक वर्षापासून चालत आलेली आणि स्त्रिया त्याच्यात भरडल्या जात होत्या स्त्रियांना अशा स्थितीत ठेवून हे पाप आहे हिंदू धर्मावरचा हा मोठा डाग आहे ही स्थिती दूर झाली पाहिजे असं ज्योतिबांनी ठरवलं घरातील घरातली एक स्त्री शिकून शहाणी झाली की सर्व कुटुंब शहाण होईल ही**

ISSN 2581-9429 IJARSCT

Copyright to IJARSCT

ज्योतिबांची धारणा होती समाज सुधारायचा असेल तर आधी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे हे ज्योतिबांच्या लक्षात आलं आपल्या मित्राशी त्यांनी चर्चा केली आणि आपल्या कामाची दिशा त्यांनी ठरवली

स्त्रियांना शिक्षण द्यायचा जोतिबांचा निश्चय पक्का झाला त्यांची सुरुवात घरापासूनच झाली सावित्रीबाई हुशार होत्या पण त्यांना लिहिता वाचता येत नव्हते पण शिकण्याची मनापासून इच्छा होती. ते वडिलांना मदत करण्याकरिता माळ्यावर जात होते दुपारी सावित्रीबाई त्यांच्यासाठी जेवण घेऊन जात जेवल्यावर त्यांची शाळा सुरू होईल झाडाखालची जमीन स्वच्छ करून बोटाने किंवा काडीने अक्षर गिरवायला सुरुवात होईल सावित्रीबाई भरभर लिहायला वाचायला शिकल्या शाळेच्या परीक्षेत पास झाल्या तेव्हा शाळेत जाऊन तिसरी आणि चौथीची परीक्षा ही त्यांनी दिली त्याचबरोबर सगुनाबाई ही शिकल्या चौथीची परीक्षा पास झाल्यावर त्या शिक्षिकेस काम करण्यास पात्र होत्या.

१ जानेवारी १८४८ या दिवशी ज्योतिबांनी बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली .पण आर्थिक अडचणीमुळे ती बंद पडली. मग पंधरा मे १९४८मध्ये जुन्या गंजपेठेत गोवंडे यांनी दिलेल्या जागेत अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. शाळेत मुले वाढल्यावर त्याच पेठेत त्यांच्या एका मुसलमान मित्राच्या जागेत नंतर ती गेली १८७१मध्ये अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची शाळा सुरू झाली. सुरुवातीला आठ मुली होत्या त्या शाळेत ज्योतिबांच्या मित्रमंडळींच्या घरच्या मुली होत्या .स्वतः ज्योतिबा त्या शाळेत शिकवत गोवंडे अहमदनगरहून या शाळेतल्या मुलींसाठी स्वतःच्या खर्चाने पुस्तके पाठवत पाट्या पुरवत वाळवेकर आणि ठोसर हे मित्र पत्र व्यवहार आणि परिपत्रके काढत मेजर कँडी शाळेला पुस्तक देत अशा अनेकांच्या मदतीने या शाळा चालत होत्या .

महात्मा ज्योतिराव फुले असे म्हणतात की श्री सुधरांना नुसते शिक्षण देऊन उपयोगाचे नाही तर जीवन जगण्यास तेलायक व्हावेत व आपले हक्क काय आहेत व आपले कर्तव्य काय याची पूर्ण जाणीव त्यांना व्हावे स्त्री सुधारणा अक्षर ओळख देऊन इतिहासाची जाणीव त्यांना झाली की ते पेटून उठतील चांगले काय वाईट काय याची जाणीव त्यांना होईल त्यामुळे त्यांच्या हक्काची जाणीव होईल तसेच ते आपल्या हक्काचे संरक्षण करण्यास तयार होतील शिक्षणाचे मूळ कारण संस्कारामध्ये आहे

कोणत्याही समाजातील नवी पिढी शरीराने व मनाने व संस्कारांनी निरोगी व्हायची असेल तर त्या समाजाचे नैतिक स्वास्थ्य निरोगी व सुसंपन्न असायला हवे

**सनातनी लोकांचे विचार :**

सनातनी लोकांनी स्त्री शिक्षणाला विरोध केला स्त्री शिक्षण म्हणजे देवधर्म व संस्कृती यांच्याविरुद्ध वर्तन होय .स्त्री शिक्षण म्हणजे हिंदू धर्म हिंदू संस्कृती यांच्याविरुद्ध भयंकर गुन्हा केल्यासारखे वृत्त होय .स्त्रीने शिक्षण घेतल्यास ती बिघडेल पदभ्रष्ट होईल असा गैरसमज होता .स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजविघातक कृत्य होय असाही गैरसमज होता .स्त्री सुशिक्षित झाल्यास पापी होईल बिघडेल कुटुंबाचे वाटोळे होईल.

**स्त्रि शिक्षणाचे कैवारी :**

स्त्रीला शाळेचा दरवाजा उघडून देण्याचे कार्य प्रथम ज्योतिबांनी केले. कुटुंबातील स्त्रीचे महत्त्व ओळखून व स्त्री शेवटी मानवच आहे या विचारातून ज्योतिबांनी स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे खुले केले. एक आदर्श माता शंभर शिक्षकाहून श्रेष्ठ असते. स्त्री शिकली म्हणजे कुटुंब शिकल्यासारखे आहे बालविकासात मातेचे किंवा स्त्रीचे स्थान खूप महत्वाचे आहे.सर्वांचा विरोध जुगारून स्त्री शिक्षणाचे महान कार्य महात्मा ज्योतिबांनी हाती घेतले.

**स्त्रि शिक्षण कार्यात आलेल्या अडचणी :**

सनातनी व धर्म मार्तंड याचा विरोध .मुलींच्या शाळेला शिक्षिका मिळेना .सावित्रीबाईंना विरोध. वडिलांमार्फत विरोध .आर्थिक अडचण.

**निष्कर्ष:**

माणूस समाजात निरक्षर राहिला तर त्याचे व समाजाचे केवढे मोठे नुकसान होते याची जाणीव महात्मा फुले यांनी समाजाला करून दिली. स्वातंत्र्यानंतर सर्व समाजसेवकांनी शिक्षणाला प्राधान्य दिले .समाजाचा व विकास व देशाची प्रगती शिक्षणाशिवाय होणे शक्य नाही हे महात्मा फुले यांनी ओळखले होते .म्हणूनच सद्यस्थितीत स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने काम करताना पाहायला मिळते .,सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करितांना दिसत आहेत स्त्रीने शिक्षण घेतले तर ती बिघडत नसून संपूर्ण कुटुंब सुधारते.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

**संदर्भ :**

१) समग्र वाङःमय

२) हंटर शिक्षण आयोग

३) डॉ. आनंद शिंदे -you tube

४) शेतकऱ्यांचा असूड

५) महात्मा फुले यांचे चरित्र डॉ.धनंजय कोर